आरती विश्वनाथ बाबांची २

आरती विश्वनाथाची,
अक्षय ज्ञानस्वरूपाची

गोरक्षाचा अवतार,
ध्यानी नंगा निरंतर,
गुरुमूर्ती निर्विकार,
सोहम बोधि ज्ञानसार,
सद्‌गती-सन्मति दात्याची,
अक्षय ज्ञानस्वरूपाची ॥ १ ॥

लीला दिव्य तेजराशी,
पाई अद्वैत माहुरासी,
नंगा प्रभू आत्मवासी,
म्हणे तुझेच तुजपाशी,
मोक्ष-योग प्रबुद्धाची,
अक्षय ज्ञानस्वरूपाची ॥ २ ॥

नाथ सहज नियती वाची,
टीवटीव टिटवी बोलाची,
पाहून संकट भक्तासी,
धावूनी बोध देशी त्यासी,
माऊली परम-दयाळाची
अक्षय ज्ञानस्वरूपाची ॥ ३ ॥

तपस्वी बुधादित्य मेळ,
देवा पाचारि सकळ,
वेद शोभी ब्रम्ह-भाळ,
स्थापूनी वीठू-काली-काल,
चाकातीर्थ सत्वद्याची / साधकाची,
अक्षय ज्ञानस्वरूपाची ॥ ४ ॥

विश्वजीवन पाझरसी,
सावली सतत भाविकासी,
पावूनी मज पामरासी,
मार्गी आशीर्वच देसी,
मागणी तुज गुरो भक्ताची,
अक्षय ज्ञानस्वरूपाची ॥ ५ ॥